प्रेस नोट दिनांक ०५/१०/२०१८

**मुंबई, कोल्हापूर,ठाणे, पुणे येथे घरफोडी चोरी करणाऱ्या अट्टल सराईत गुन्हेगाराच्या युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरने आवळल्या मुस्क्या**

युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पो.शि. गजानन सोनुने यांना मिळालेल्या माहितीवरून दोन संशयीत इसम नामे १) हर्षद ऊर्फ पक्या गुलाब पवार, वय २४ वर्षे, निकटेवस्ती, घोटावडे फाटा, बांदल हाईट्स, फ्लॅट नं. १६, पिरंगुट, ता.मुळशी,जि.पुणे सध्याचा पत्ता फ्लॅट नं. १०८,मातोश्री सदन, मुंब्रा कॉलनी, गणपत वाडेकर शाळेजवळ, मुंब्रा दिवा, ठाणे व २) दिनेश मधुकर देशमुख, वय ३८ वर्षे, लक्ष्मी हौसींग सोसायटी, रुपीनगर, जूनी ज्ञानदीप शाळा, तळवडे, निगडी,पुणे-६५ यांना ताब्यात घेवून व विश्वासात घेवून पोलीस उप निरीक्षक दिनेश पाटील व स्टाफ यांनी त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी वृंदावन गार्डन शेजारी, श्रीविला अपार्टमेंट, फुरसुंगी,हडपसर येथे १५/२० दिवसा पुर्वी घरफोडी चोरी केलेबाबत सांगीतले आहे.

सदरबाबत हडपसर पो.स्टे. येथे अभिलेखाची पहाणी केली असता सदरबाबत गु.रं.नं. ९८४/२०१८ भादविक. ४५४,३८०,३४ अन्वये गुन्हा दाखल असलेचे समजलेने सदर आरोपींना नमुद गुन्हयात अटक करून, त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे अधिक तपास केला असता, त्यांनी सुमारे एक ते दिड वर्षापासून पुणे शहरामध्ये हडपसर, विश्रांतवाडी, भारती विद्यापीठ, सिंहगड रोड, अलंकार, बिबवेवाडी, कोरेगांव पार्क, मुंढवा, हिंजवडी या पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये २६ घरफोडी चोरी केलेचे तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपींकडून १७,००,२००/- रु. चा मुद्देमाल त्यामध्ये सोन्याचे ५२२ ग्रॅम (अर्ध्या किलोपेक्षा जास्त) वजनाचे दागीने व चांदीचे ८८० ग्रॅम वजनाचे दागीने जप्त, रोख १५,०००/- रोख व गुन्हयात वापरलेली एक यामाहा एफझेड मोटार सायकल किं.रु. ७०,०००/- असा एकुण १७,००,२००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपी हे सराईत गुन्हेगार असून, आरोपी क्र. १ याचेवर यापूर्वी ४० गुन्हे दाखल असून आरोपी क्र. २ याचेवर २ गुन्हे दाखल आहेत. तसेच त्यांचेकडे सखोल तपास केला असता, त्यांनी सोलापूर, चाकण, लोणीकंद व इतर ठिकाणी घरफोडी चोरी केलेबाबत सांगत आहेत. सदर आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, पोलीस उप निरी. हर्षल कदम, व पोलीस कर्मचारी गजानन सोनुने, पो.हवा. प्रकाश लोखंडे, रिजवान जिनेडी, अशोक माने, प्रशांत गायकवाड, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, तुषार माळवदकर, मपोहवा अनुराधा धुमाळ, उमेश काटे, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, सचिन जाधव, इम्रान शेख यांनी केली आहे.


गुन्हे शाखा,
युनिट १
पुणे शहरची
उत्कृष्ट कामगिरी

